सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५ | बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

# दै. ग्लोबल महातेजच्या शाळांच्या दुर्दशेबाबतच्या बातमीची झेड. पी. कडून तत्काळ दखल

## सीईओ मीनल करणवाल यांनी स्वत: अधिकाऱ्यांना दिले स्वच्छतेचे निर्देश!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर :** वृत्तपत्रात विश्वात समस्याप्रधान बातम्या जवळपास सर्वच वृत्तपत्र देतात. मात्र, त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी सहसा कोणतेही वृत्तपत्र स्वत: कोणताही प्रयत्न करीत नाही. ग्लोबल महातेजने मात्र वृत्तपत्र क्षेत्रात लोकाभिमुखतेचा व जनसामान्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रथमच क्रांतीकारी पायंडा सुरू केला आहे. ज्या विभागाची समस्या असेल त्या विभागाच्या वरिष्ठांना ग्लोबल महातेज वृत्तपत्राच्या कात्रणासह समस्येची जाणीव करून देणारे पत्र देते. समस्या सुटावी यासाठी वरिष्ठ स्तरावरून स्वत: प्रयत्न करते.



अमळनेर तालुक्यातील अनेक शाळांमध्ये सीसीटीव्ही व तक्रारपेट्याच नाहीत

स्वच्छतागृहांची अवस्था तर छी...! छी...!! छी...!!!

दै. ग्लोबल महातेजच्या अंकात प्रसिद्ध झालेली बातमी.

७ आक्टोबर रोजी या पायंड्याला सीईओ मीनल करणवाल यांच्या रुपाने तत्काळ प्रतिसादाचे फलित लाभले आहे. दि. ७ ऑक्टोबर रोजी दै. ग्लोबल महातेजमध्ये प्रसिद्ध झालेल्या शाळांमध्ये सीसीटीव्ही नसणे, पत्रपेट्या नसणे व स्वच्छतागृहांची कमालीची दुर्दशा असणे याबाबतचे आकडेवारीनिहाय सविस्तर वृत्त प्रसिद्ध झाले होते. या वृत्ताची प्रत सीईओ मीनल करणवाल यांना मिळताच त्यांनी अधिकाऱ्यांना स्वच्छतागृहांची स्वच्छता व अन्य बाबींबाबत स्वत: निर्देश दिले.

सीईओ करणवाल यांच्यासारखे कर्तव्यदक्ष व संवेदनशिल अधिकारी सर्वच विभागांना लाभले, तर निश्चितपणे सर्वसामान्यांच्या समस्या मार्गी लागल्याशिवाय राहणार नाहीत. करणवाल यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे जे काम होईल ते होईल किंवा फारसे होणारही नाही याचीही मानसिक तयारी आहे. याचे कारण म्हणजे वरिष्ठांनी सांगितलेली चांगली कामे त्यांच्या हाताखालील अधिकारी व कर्मचारी करतातच असे नाही.

मात्र, तरीही करणवाल यांच्या कर्तव्यदक्षतेला ग्लोबल महातेजचा मानाचा मुजरा! भविष्यात याही पुढे जनसामान्यांच्या समस्या सोडवणुकीसाठी ग्लोबल महातेज कटिबद्ध होता... आहे... व राहील...!




## दिनविशेष

०८ ऑक्टोबर

- इंडियन एअर फोर्स अ‍ॅक्ट द्वारे भारतीय वायूदलाची स्थापना झाली.
- स्वातंत्र्यवीर सावरकर यांना पुणे विद्यापीठाने सन्माननीय डी-लिट पदवी घरी येऊन दिली.
- वन्यजीव सप्ताह

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पातोंडा येथे पथसंचलन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटनात्मक रचनेनुसार पातोंडा परिसराला "तालुका आयाम" म्हणून मान्यता मिळाली आहे. विजयादशमीनिमित्त रविवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी पथसंचन झाले. कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी चारला पातोंडा ग्रामपंचायत चौकातून झालेल्या पथसंचलनाने झाली. स्वयंसेवकांनी गणवेशात, दंड आणि घोषांच्या निनादात संचलन केले. संचलनात बाल, तरुण आणि ज्येष्ठ स्वयंसेवकांचा उत्साही सहभाग होता. गावातील नागरिकांनी ठिकठिकाणी फुलांची उधळण करून स्वागत केले. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता विजयादशमी उत्सवाचा मुख्य कार्यक्रम झाला. रुंधाटी येथील नूतन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोनवणे प्रमुख पाहुणे होते.

श्रीकांत पाठक संघ हा केवळ संघटना नसून एक संस्कार संस्था आहे जी राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने समाजशक्ती जागृत करते असे सांगितले. संजय वैद्य यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी पातोंडा तालुक्यातील सर्व शाखांतील स्वयंसेवक, ग्रामस्थ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# जानवे गावाच्या प्रवेशद्वाराजवळ कचऱ्याचे ढिग

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील जानवे गावात प्रवेश करताच दिसणारे दृश्य ग्रामस्थ आणि प्रवाश्यांच्या मनात किळसवाणा भाव निर्माण करते. गावाच्या प्रवेशद्वारालगतच कचऱ्याचे लांबलचक ढिग साचले आहेत. प्लास्टिक, कुजलेला कचरा, गवत, तसेच घरगुती व जैविक कचऱ्याचे ढीग पाहून ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. दुर्गंधीयुक्त परिसरातून जाणे सुद्धा कठीण झाले आहे.

विशेष म्हणजे हा कचरा ग्रामीण रुग्णालयाच्या संरक्षण भिंतीलगत टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे परिसरात माशा, डास आणि जंतूंचा प्रादुर्भाव वाढून आरोग्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. रुग्णालयाच्या जवळच अशा प्रकारे अस्वच्छता असल्याने रुग्ण आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनाही याचा त्रास होत आहे. वारंवार तक्रारींनंतरही ग्रामपंचायतीकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. गावाच्या वेशीवरच इतकी घाण साचलेली असल्याने स्वच्छ भारत अभियानाचे पार तीन- तेरा वाजले आहेत. अनेक वेळा ग्रामपंचायत व आरोग्य विभागाला लेखी तक्रारी देऊनही कचरा उचलला गेला नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची समस्या उद्भवली आहे. दरम्यान, परिसरात निर्माण झालेल्या दुर्गंधीमुळे प्रवाशांनाही त्रास होत आहे. काही ठिकाणी कचऱ्याला आग लावल्याने धूर आणि प्रदूषणाचा त्रास वाढतो. ही परिस्थिती कायम राहिल्यास संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तातडीने या कचऱ्याची विल्हेवाट लावावी, रुग्णालय परिसर स्वच्छ करावा आणि नियमित साफसफाईसाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी. अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# कावपिंप्री- शिरूड रस्ता खड्डेमय

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : कावपिंप्री ते शिरूड रस्ता अनेक गावांना जोडणारा मुख्य मार्ग आहे. मात्र, या रस्त्याची अत्यंत दूरवस्था झाली आहे. मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त आहे. याबाबत लोकप्रतिनिधींसह प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

मोठमोठे खड्डे, विस्कळीत डांबरामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता अधिक वाढली आहे. या रस्त्याचा वापर अमळनेर- शिरूड- धुळे या मार्गावरील अनेक ग्रामस्थ तसेच शालेय विद्यार्थी, शेतकरी व कामगार दररोज करतात. पावसाळ्यात खड्ड्यांत पाणी साचल्याने खड्डे दिसेनासे होतात. त्यामुळे अनेकदा अपघातही घडले आहेत. काही ठिकाणी रस्ता पूर्णपणे उखडून गेला आहे. वाहनांना पर्यायी रस्त्याचा शोध घ्यावा लागतो. स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या. मात्र, अद्याप कोणतीही ठोस दुरुस्ती झालेली नाही. प्रशासनाचे दुर्लक्ष आणि ठेकेदारांची उदासीनता यामुळे जनतेत नाराजी आहे.

# 'लाडकी बहीण 'मुळे 'आनंदाचा शिधा ' बंद?

## ज्येष्ठ मंत्र्यांचा दावा : ४५ हजार कोटी रुपये येतो खर्च

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शिवजयंती, गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गणेशोत्सव आणि दसरा-दिवाळी या सणांच्या काळात सर्वसामान्यांना दिला जाणारा ' आनंदाचा शिधा ' यंदा गणेशोत्सवानंतर आता दिवाळीलाही मिळणार नाही. महायुतीच्या सरकारने तीन वर्षांपूर्वी सुरू केलेली ही योजना आर्थिक चणचणीमुळे बंद होण्याच्या मार्गावर आहे. ' लाडकी बहीण ' योजनेमुळे या योजनेचा बळी गेल्याची चर्चा सुरू असताना मंत्रिमंडळातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी यास दुजोरा दिला आहे.

**आर्थिक अडचणींमुळे निर्णय?**

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी ' लाडकी बहीण ', शेतकऱ्यांना मोफत वीज, ' आनंदाचा शिधा ' आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थाटन योजना यांसारख्या लोकप्रिय योजनांची घोषणा केली होती. मात्र, सत्तेत आल्यानंतर आर्थिक अडचणींमुळे अनेक योजनांना कात्री लागली. यंदा दिवाळीत ' आनंदाचा शिधा ' देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाने फेटाळून लावला आहे. शिधा वाटपासाठी ३५० कोटी रुपये खर्च येतो, तर ' लाडकी बहीण ' योजनेसाठी ४० ते ४५ हजार कोटी रुपये लागतात, असे छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यामुळे या योजनेचा फटका ' आनंदाचा शिधा 'ला बसल्याचे त्यांनी सुचविले.

**भुजबळांचा सवाल : ' पैशांचे सोंग घेता येत नाही '**

छगन भुजबळ म्हणाले, की शिवभोजन थाळी योजनेसाठीही निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. या योजनेसाठी वर्षाला १४० कोटी रुपये लागतात. मात्र सध्या फक्त ७० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. सर्वच विभागांना निधीची कमतरता जाणवत आहे. मंत्रिमंडळात यावर चर्चा झाली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीही ' पैशांचे सोंग घेता येत नाही ', असे स्पष्ट केले. सर्व मंत्र्यांच्या गाड्या विकल्या तरी पुरेसा निधी मिळेल का? असा उपरोधिक प्रश्न भुजबळांनी केला.

**दिवाळीतील अपेक्षाभंग**

यंदा राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे ६० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. लाखो शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही. अशा परिस्थितीत ' आनंदाचा शिधा ' योजनेतून तरी दिवाळीत दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, दिवाळी अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपली असताना शिधा वाटपाची कोणतीही तयारी दिसत नाही. इतक्या कमी वेळेत वाटप करणे अशक्य असल्याचे उच्चपदस्थांनी सांगितले.

**योजना फक्त कागदावर?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांनी कोणतीही योजना बंद होणार नाही, असे वारंवार जाहीर केले आहे. मात्र, ' लाडकी बहीण ' आणि शेतकऱ्यांना मोफत वीज यांसारख्या मोजक्या योजनांशिवाय इतर योजनांसाठी निधीच उपलब्ध होत नसल्याने त्या केवळ कागदावरच राहिल्या आहेत. ' आनंदाचा शिधा ' योजनेतून सणासुदीच्या काळात गोरगरिबांना दिलासा देण्याचा महायुती सरकारचा मानस होता. परंतु आर्थिक अडचणींमुळे ही योजना आता बंद होण्याच्या मार्गावर आहे.

# धुळे रस्त्यावरील एचपी गॅस गोडाऊनजवळील लक्झरी थांब्यामुळे वाहतुकीची कोंडी

## स्वतंत्र वाहनतळाची मागणी; स्थानिक प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : धुळे रस्त्यावरील एच. पी. गॅस गोडाऊन जवळ विविध ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या खासगी बसचा थांबा आहे. मात्र, या थांब्यावर एकाच रांगेत बसेस लागणे अपेक्षित आहे. मात्र, अनेकदा रस्त्याच्या दुतर्फा व उपलब्ध होईल तेथे खासगी बसगाड्या पार्क होत असल्याने वाहतुकीची नेहमी कोंडी होत असते. खासगी बसेससाठी स्वतंत्र वाहनतळ उभारण्यात यावे. स्वतंत्र वाहनतळ तयार होईपर्यंत खासगी बसेसच्या पार्किंगला स्थानिक प्रशासनाने शिस्त लावावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मुंबई, पुणे, ठाणे, बोरीवली, डोंबीवली, पनवेल, नाशिक अशा लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी खासगी बसेसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी असते. सदर खासगी ट्रॅव्हल्सच्या गाड्या साधारणतः रात्री सात वाजेनंतर ते नऊ- साडेनऊ वाजेपर्यंत प्रवाशांना बसविण्यासाठी, सामान चढविण्यासाठी आणि थांबण्यासाठी रस्त्याच्या कडेला उभ्या राहतात. या गाड्या ज्या ठिकाणी उभ्या राहातात तो परिसर शहरातील विविध कॉलन्यांकडे जाणारा आहे. तसेच धुळे- चोपडा- पारोळा- जळगाव आदी गावांकडे याच रस्त्यावरून वाहने जातात. शहरी भागातील कॉलन्यांकडे व बाहेर गावी जाणाऱ्या गाड्यांच्या संख्येत सायंकाळनंतर मोठी वाढ होते. खासगी ट्रॅव्हल्सच्या गाड्या जेथे उभ्या राहातात तेथून सदर गाड्यांना मार्ग काढणे खूप कठीण जाते. अनेकदा या ठिकाणी छोटे- मोठे अपघातही होतात. सायकलस्वार व पायी चालणाऱ्यांना तर मार्गक्रमण करणे खूपच कठीण होते. खरे तर जेथे खासगी ट्रॅव्हल्सच्या सर्व गाड्या उभ्या राहातात तो शासनमान्य अधिकृत थांबा नाही. केवळ खासगी ट्रॅव्हल्स चालक- मालक आणि प्रवाशी यांची सोय व्हावी म्हणून तत्कालिन पोलिस व प्रशासनाने सुचविलेली ती जागा आहे. मात्र, त्यावेळी खासगी ट्रॅव्हल्सची संख्या फारशी नव्हती. आता ही संख्या वाढल्याने वाहतुकीच्या समस्येतही वाढ झाली आहे. त्यामुळे त्यावर काही अघटित व अप्रिय होण्याच्या आतच संबंधित यंत्रणेने मार्ग काढावा, अशी मागणी होत आहे.



**तक्रार खासगी बससेवेची नाहीच... तक्रार आहे ती केवळ अस्ताव्यस्त पार्किंगची...!**

अमळनेर शहरात जेव्हापासून खासगी लक्झरी बससेवा सुरू झाली आहे. तेव्हापासून खास करून मुंबई- पुणेकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय झाली आहे. दिवसेंदिवस ही बससेवा फोफावते आहे. अर्थात त्यामुळे अधिकाधिक प्रवाशांची आरामदायी प्रवासाची सोय होत आहे. शिवाय या व्यवसायातून अनेकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नोकरी व व्यावसायाच्या संधीही वाढल्या आहेत. ही निश्चितपणे समाधनाची बाब आहे. खासगी बस सेवा व्यावसायातील स्पर्धेमुळे अधिकाधिक चांगल्या दर्जाच्या बससेवा प्रवाशांना उपलब्ध होत आहेत. त्यामुळे ही बससेवा सर्वांसाठी अत्यावश्यक व स्वागतार्हच आहे. या बससेवेचा सर्वांना लाभच होतो आहे. फक्त त्यांच्या पार्किंगची व्यवस्था नसल्याने समस्या उद्भवत आहेत. त्याचे कारण म्हणजे काही लक्झरी चालक तसेच प्रवाशांना सोडावयास आलेली चारचाकी वाहने, रिक्षा व मोटारसायकलही मनमानी पद्धतीने पार्किंग करतात. तसेच लक्झरी हलेपर्यंत अनेक प्रवासी व त्यांना सोडावयास आलेले त्यांचे आप्तेष्ट घोळक्याने भर रस्त्यावर उभे राहातात. त्यामुळेही मोठी अडचण निर्माण होते. शिवाय अपघाताचे धोकेही वाढतात. हीच खरी अडचण आहे. अन्यथा सिझनमध्ये प्रवास भाड्यात अवाजवी वाढ होते. याव्यतिरिक्त खासगी बससेवेबद्दल

# मसाला पान





# दुबईत १० किलो सोन्याचा ड्रेस : किंमत ११ कोटी; गीनिज बुकात नोंद

सोन्याच्या दागिन्यांबाबत दुबई नेहमीच चर्चेत असते. मात्र यावेळी एका अनोख्या आणि वैभवशाली ड्रेसने सगळ्यांचेच लक्ष वेधले आहे. तब्बल १०.०८१२ किलो २१ कॅरेट सोन्यापासून बनलेला हा ड्रेस जगातील सर्वांत महागडा ड्रेस ठरला आहे. त्याची किंमत चक्क ११ कोटी रुपये आहे. गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने याची नोंद घेतली आहे. त्यामुळे हा ड्रेस आता आलिशान कारागिरी आणि सर्जनशीलतेचे प्रतीक बनला आहे.

### ड्रेसची निर्मिती आणि वैशिष्ट्ये

शारजाह येथील एक्स्पो सेंटरमध्ये प्रदर्शनासाठी ठेवलेला हा ड्रेस अल रोमाइजान गोल्ड अॅण्ड ज्वेलरी कंपनीने तयार केला आहे. ९८० तासांच्या अथक परिश्रमानंतर हा ड्रेस साकारला गेला. यात वापरलेली २१ कॅरेट सोन्याची शुद्धता आणि महागडे रत्नजडित दागिने यामुळे हा ड्रेस वैभवशालीतेचा उत्कृष्ट नमुना ठरला आहे. या ड्रेसचे एकूण वजन १०.०८१२ किलो आहे. त्याची रचना इतकी बारकाईने केली आहे, की तो परिधान करता येणे शक्य आहे. मात्र तरीही त्याचे प्रदर्शन मुख्यतः कला आणि संपत्तीचे प्रतीक म्हणून केले जाते.

### सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व

दुबई हे सोन्याचे आंतरराष्ट्रीय केंद्र आहे. हा ड्रेस त्या परंपरेचा एक भाग आहे. मध्यपूर्वेतील संस्कृतीत सोन्याला केवळ आर्थिक मूल्यच नव्हे, तर सामाजिक प्रतिष्ठेचे आणि सौंदर्याचे प्रतीक म्हणूनही पाहिले जाते. हा ड्रेस तयार करणाऱ्या अल रोमाइजान गोल्ड अॅण्ड ज्वेलरी कंपनीने यापूर्वीही अनेक अनोख्या डिझाईन्स सादर केल्या आहेत. हा ड्रेस त्यांच्या सर्जनशीलतेचा कळस मानला जातो. ११ कोटी रुपये किंमत असलेला हा ड्रेस केवळ एक वस्त्र नव्हे, तर कला, कारागिरी आणि तंत्रज्ञान यांचा संगम आहे. या ड्रेसच्या निर्मितीमुळे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय ज्वेलरी उद्योगात दुबईचे स्थान आणखी मजबूत झाले आहे. सोन्याच्या बाजारपेठेत दुबईची ख्याती जगभर आहे. हा ड्रेस त्या प्रतिष्ठेची साक्ष देतो. तसेच यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली. त्याचाच परिणाम म्हणून शारजाह एक्स्पो सेंटरमध्ये हा ड्रेस पाहण्यासाठी हजारो लोकांनी गर्दी केली होती.

### ड्रेसचे चार प्रमुख भाग

- ३९८ ग्रॅमचा गोल्डन क्राऊन : ड्रेसला राजेशाही थाट देणारा मुकूट
- ८,८१०.६० ग्रॅमचा स्टेटमेंट नेकलेस : वैभव आणि भव्यतेचे प्रतीक.
- १३४.१ ग्रॅमचे इअररिंग्स : नाजूक आणि आकर्षक डिझाइन.
- ७३८.५ ग्रॅमचे गोल्ड पीस : ड्रेसला पूर्णत्व देणारे तुकडे.

### भविष्यातील शक्यता

या ड्रेसच्या यशाने ज्वेलरी उद्योगाला नवे दिशादर्शन मिळाले आहे. भविष्यात अशा आणखी नावीन्यपूर्ण डिझाइन्स पाहायला मिळू शकतात, ज्या पारंपरिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालतील. तसेच, हा ड्रेस पर्यावरणस्नेही आणि टिकाऊ पद्धतीने बनवण्याच्या दृष्टीनेही प्रेरणा देऊ शकतो. त्याचे कारण म्हणजे सध्याच्या काळात लक्झरी उद्योगात टिकाऊपणाला महत्त्व वाढत आहे.

### तांत्रिक आणि सौंदर्यात्मक वैशिष्ट्ये

हा ड्रेस तयार करताना अत्यंत प्रगत तंत्रज्ञान आणि पारंपरिक कारागिरी यांचा वापर करण्यात आला. २१ कॅरेट सोन्याच्या शुद्धतेमुळे ड्रेसला चमक आणि टिकाऊपणा मिळाला. रत्नजडित डिझाइन्समुळे त्याला सौंदर्य प्राप्त झाले. ड्रेसचे वजन आणि रचना यामुळे तो परिधान करणे आव्हानात्मक आहे. मात्र त्याची रचना अशी आहे, की तो मंचावर किंवा प्रदर्शनात सहज लक्ष वेधतो. ड्रेसच्या प्रत्येक तुकड्यावर बारकाईने काम केले गेले आहे. त्यातील नक्षीकाम आणि रत्नांचे स्थान यामुळे तो एक कालातीत कलाकृती बनला आहे.

### जागतिक पातळीवर चर्चा

हा ड्रेस गिनीज बुकात नोंदला गेल्याने दुबईच्या ज्वेलरी उद्योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. सोशल मीडियावरही या ड्रेसची जोरदार चर्चा झाली, आणि अनेकांनी याला "लक्झरीचा चमत्कार" असे संबोधले. हा ड्रेस केवळ आर्थिक मूल्यच व्यक्त करत नाही, तर मानवी सर्जनशीलतेची आणि कलेतील नावीन्याची कथा सांगतो. काहींच्या मते, हा ड्रेस सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे, पण तो दुबईच्या वैभवशाली संस्कृतीचे आणि जागतिक ज्वेलरी बाजारातील नेतृत्वाचे प्रतीक आहे. हा ड्रेस पाहण्यासाठी शारजाह एक्स्पो सेंटरमध्ये आलेल्या पर्यटकांनी याला "सोन्याचा चमत्कार" असे नाव दिले.

# शौर्य, समर्पण आणि देशसेवेचा उत्सव



## भारतीय वायुसेना दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतात भारतीय वायुसेना दिवस म्हणून साजरा केला जातो. सन १९३२ मध्ये स्थापन झालेली भारतीय वायुसेना ही देशाच्या संरक्षणातील एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. हा दिवस वायुसेनेच्या शौर्य, समर्पण आणि देशभक्तीला वंदन करतो. ज्यांनी आकाशातून भारताच्या सीमांचे रक्षण करताना आपले प्राण पणाला लावले त्यांच्याप्रती या दिवशी संवेदना व्यक्त केली जाते. यंदा ८ ऑक्टोबर रोजी साजरा होणारा हा दिवस वायुसेनेच्या ९३ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाला उजाळा देतो. या निमित्ताने भारतीय वायुसेनेच्या इतिहास व योगदानाची गौरव गाथा जाणून घेऊया...!

### भारतीय वायुसेनेची स्थापना आणि इतिहास

भारतीय वायुसेनेची स्थापना ८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिश राजवटीदरम्यान 'रॉयल इंडियन एअर फोर्स' म्हणून झाली. तेव्हा वायूसेनेकडे फक्त सहा राफेल विमाने आणि खूप कमी प्रशिक्षित वैमानिक होते. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तिचे नाव ' भारतीय वायुसेना ' असे झाले. ती स्वतंत्र भारताच्या संरक्षणाचा अविभाज्य भाग बनली. दुसऱ्या महायुद्धापासून ते १९४८, १९६५, १९७१ आणि १९९९ च्या कारगिल युद्धापर्यंत वायुसेनेने प्रत्येक मोठ्या लढाईत आपली क्षमता सिद्ध केली आहे.

### वायुसेनेचे शौर्य आणि योगदान

भारतीय वायुसेना केवळ युद्धकाळातच नव्हे; तर शांततेच्या काळातही देशसेवेत अग्रेसर आहे. युद्धकाळातील काही महत्त्वाचे योगदान पाहूया.

१) १९४७-४८ चे काश्मीर युद्ध : स्वातंत्र्यानंतर लगेचच वायुसेनेने काश्मीरमध्ये घुसखोरांविरुद्ध लढताना सैन्याला हवाई मदत पुरविली आणि श्रीनगर विमानतळ वाचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.
२) १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध : वायुसेनेने पूर्व आणि पश्चिम आघाड्यांवर निर्णायक हवाई हल्ले करून बांगलादेशच्या निर्मितीत मोलाची भूमिका निभावली.
३) कारगिल युद्ध (१९९९) : ' ऑपरेशन सफेद सागर ' अंतर्गत वायुसेनेने अतिउंचावरील लक्ष्यांवर अचूक हल्ले करून विजय मिळविला.
४) बालाकोट हवाई हल्ला (२०१९) : पुलवामा हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून वायुसेनेने पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. त्यामुळे वायूसेनेची ताकद जगासमोर आली.

युद्धकाळाव्यतिरिक्त वायुसेना नैसर्गिक आपत्तींमध्येही बचावकार्य आणि मानवीय मदतकार्यात सहभागी होते. २००४ च्या त्सुनामी, २०१३ च्या उत्तराखंड पूर आणि २०२० च्या कोविड-१९ संकटात वायुसेनेने औषधे, अन्न आणि वैद्यकीय उपकरणे पोहोचविण्याचे काम केले.

आधुनिक वायुसेना : तंत्रज्ञान आणि सामर्थ्य भारतीय वायुसेना ही आजमितीस जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वांत शक्तिशाली वायुसेना मानली जाते. राफेल, सुखोई-३० MKI, तेजस, मिराज-२००० यांसारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने, अपाचे आणि चिनूक हेलिकॉप्टर्स, तसेच एस-४०० सारख्या हवाई संरक्षण यंत्रणा यामुळे वायुसेनेची ताकद वाढली आहे. ड्रोन तंत्रज्ञान, सायबर युद्धक्षमता आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनांवर भर देत वायुसेना आत्मनिर्भर भारताच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

**वायुसेना दिनाचा उत्सव**

वायुसेना दिनानिमित्त प्रत्येक वर्षी दिल्लीतील हिंडन एअर बेस येथे भव्य सोहळा आयोजित केला जातो. या सोहळ्यात हवाई कवायती, लढाऊ विमानांचे प्रात्यक्षिक आणि वायुसैनिकांचे शौर्य प्रदर्शन केले जाते. याशिवाय देशभरातील वायुसेना तळांवर विशेष कार्यक्रम, परेड आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. हा दिवस वायुसेनेच्या शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा आणि नव्या पिढीला देशसेवेसाठी प्रेरित करण्याचा आहे.

भारतीय वायुसेनेचे ब्रीदवाक्य – ' **नभः स्पृशं दीप्तम्** ' आहे. ( आकाशाला स्पर्श करणारी तेजस्विता ). हे ब्रीदवाक्य वायुसेनेच्या ध्येय, धैर्य आणि उत्कृष्टतेचे प्रतीक आहे. वायुसैनिकांचा त्याग, शिस्त आणि देशभक्ती प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशीच आहे.



### आजच्या काळातील प्रासंगिकता

आजच्या जागतिक परिस्थितीत जेथे सायबर युद्ध, ड्रोन हल्ले आणि हवाई संरक्षण यांचे महत्त्व वाढले आहे तेथे भारतीय वायुसेना सतत स्वतःला आधुनिक ठेवत आहे. स्वदेशी तेजस विमान आणि DRDO च्या प्रकल्पांमुळे भारत संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होत आहे. याशिवाय वायुसेनेने महिला वैमानिकांना सामील करून लैंगिक समानतेचा आदर्श घालून दिला आहे. मेजर अवनी चतुर्वेदी, भावना कांत आणि मोहना सिंग यांसारख्या महिला वैमानिकांनी इतिहास रचला आहे. भारतीय वायुसेना दिवस हा केवळ एक उत्सव नसून, देशाच्या आकाशरक्षकांचा सन्मान आणि त्यांच्या बलिदानाला वंदन आहे. वायुसेनेचे शौर्य, तंत्रज्ञान आणि समर्पण यामुळे भारताच्या सीमा सुरक्षित आहेत. या वायुसेना दिवसानिमित्त आपण सर्वांनी वायुसैनिकांचे आभार मानले पाहिजेत. त्यांच्या ध्येयाला पाठिंबा देण्याचा संकल्प केला पाहिजे.



# सर्वोच्च न्यायालयाचा वृद्ध पालकांच्या हक्कांसंबंधी महत्त्वपूर्ण निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने मेन्टेनन्स अॅण्ड वेलफेअर ऑफ पॅरेंट्स अॅण्ड सीनिअर सिटिझन्स अॅक्ट २००७ (वृद्ध पालक आणि ज्येष्ठ नागरिक कायदा) अंतर्गत ट्रिब्युनलला वृद्ध पालकांच्या कल्याणासाठी घरभाडे किंवा मालमत्ता हस्तांतरित करण्याचा आणि ताबा परत घेण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे. हे निर्णय वृद्ध पालकांना मुलांच्या उपेक्षेमुळे होणाऱ्या त्रासापासून संरक्षण देण्यासाठी आहेत. अलीकडील निर्णयात (सप्टेंबर २०२५) न्यायालयाने अशा मुलांना जे पालकांची काळजी घेत नाहीत त्यांना पालकांच्या मालमत्तेतून बेदखल करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे कायद्याचा उद्देश वृद्धांना वेगवान, सोपा आणि स्वस्त न्याय मिळविणे होतो.

### प्रकरणाचे तपशील

**प्रकरणाचे नाव :** ऊर्मिला दीक्षित विरुद्ध सुनील शरण दीक्षित आणि इतर (सर्वोच्च न्यायालय, २०२५).
**घटना :** एका वृद्ध आईने (ऊर्मिला दीक्षित) आपल्या मोठ्या मुलाकडे (सुनील शरण दीक्षित) मालमत्ता हस्तांतरित केली होती. ज्यात मुलाने आईची काळजी घेण्याची अट होती. मात्र, मुलाने ही अट पाळली नाही. त्याने आईला मालमत्तेतून बाहेर काढले. त्यामुळे आईने ट्रिब्युनलकडे अर्ज केला. ट्रिब्युनलने मुलालाच मालमत्तेतून बाहेर काढण्याचा आणि मासिक भरणपोषण देण्याचा आदेश दिला. हायकोर्टाने हा आदेश रद्द केला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द केला.
**समान प्रकरण :** दुसऱ्या प्रकरणात (मिश्रा कुटुंब, २०२५) वृद्ध आई-वडील गावात गेले असताना मुलाने घराचा ताबा घेतला आणि परतल्यावर प्रवेश नाकारला. ट्रिब्युनलने मुलाला बाहेर काढण्याचा आणि तीन हजार रुपये मासिक भरणपोषण देण्याचा आदेश दिला. हाय कोर्टाने हा आदेश रद्द केला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाचा निर्णय उलटवून ट्रिब्युनलच्या अधिकाराची पुष्टी केली.

### न्यायालयाची कायद्याबाबत निरीक्षणे

ट्रिब्युनलचे अधिकार : कलम २३ अंतर्गत ट्रिब्युनलला मालमत्ता हस्तांतरण रद्द करून ताबा परत देण्याचा अधिकार आहे. विशेषतः जेव्हा मुले आई-वडिलांची काळजी घेण्याची अट पाळत नाहीत. हे वृद्धांच्या कल्याणासाठी आवश्यक आहे. अन्यथा कायद्याचा उद्देश निष्फळ होईल.

### दोन आधार

उदार रीतीने व्याख्या : कायदा हा सामाजिक कल्याणकारी आहे. त्याची उदार रीतीने व्याख्या करावी. मुलांची उपेक्षा ही कायद्याचे उल्लंघन असून, त्यासाठी बेदखल करणे योग्य आहे. हे संविधानातील वृद्धांच्या हक्कांना (कलम २१ – जीवनाचा अधिकार) बळकटी देते.
**मुलांची जबाबदारी :** मुलांना (आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यास) पालकांची काळजी घेणे बंधनकारक आहे. बेदखल ही शेवटची उपाययोजना असावी. पण उपेक्षेबाबत ती आवश्यक आहे. न्यायमूर्ती सी.टी. रवीकुमार आणि संजय करोल यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदविले. हा निर्णय वृद्ध पालकांना मुलांच्या बेजबाबदारीविरुद्ध मजबूत संरक्षण देतो. कायद्याच्या अंमलबजावणीत सतर्कता वाढवितो. अधिक माहितीसाठी कायद्याच्या अधिकृत संकेतस्थळावर (socialjustice.gov.in) पाहा.

# आयएएस मधु रानी : पति की मृत्यु के बाद भी नहीं टूटीं, देश सेवा में जुटीं



दिल्ली की मधु रानी तेवतिया एक प्रेरणादायी आयएएसस अधिकारी हैं, जिन्होंने जीवन की कठिनाइयों का डटकर सामना किया। २००८ में यूपीएससी सीएसई परीक्षा पास कर वे आयएएस बनीं । वर्तमान में दिल्ली की मुख्यमंत्री की सचिव के रूप में सेवा दे रही हैं। पति की मृत्यु के बाद भी उन्होंने हार नहीं मानी और देश सेवा को अपनी ताकत बनाया।

**शैक्षिक पृष्ठभूमि**

मधु रानी ने दिल्ली यूनिवर्सिटी के नेहरू होम्योपैथिक मेडिकल कॉलेज से बीएचएमएस की डिग्री प्रथम श्रेणी में हासिल की। इसके बाद उन्होंने आयआयटी मद्रास से एग्जीक्यूटिव एमबीए और स्ट्रैटेजिक लीडरशिप अॅण्ड पब्लिक पॉलिसी में डिग्री प्राप्त की। देश सेवा की चाहत ने उन्हें शानदार करियर छोड़कर यूपीएससी की तैयारी के लिए प्रेरित किया। २००८ में कठिन परिश्रम के बाद मधु रानी ने यूपीएससी सीएसई परीक्षा पास की और २००९ में मध्य प्रदेश कैडर में आयएस अधिकारी नियुक्त हुईं। उनकी पहली पोस्टिंग एसडीएम के रूप में हुई।

**व्यक्तिगत जीवन की त्रासदी**

मधु रानी ने २००९ बैच के मध्य प्रदेश कैडर के आयपीएस अधिकारी नरेंद्र कुमार सिंह से शादी की थी। एक दुर्घटना में उनके पति की मृत्यु हो गई, जिससे उनकी जिंदगी पूरी तरह बदल गई। इस दुखद घटना के बावजूद उन्होंने हिम्मत नहीं हारी और अपने कर्तव्यों का निर्वहन जारी रखा।

**कैडर परिवर्तन और नई जिम्मेदारियां**

पति की मृत्यु के बाद मधु रानी ने कैडर बदलने का अनुरोध किया, जिसके बाद उन्हें अरुणाचल प्रदेश, गोवा, मिजोरम और केंद्र शासित प्रदेश कैडर आवंटित हुआ। उन्होंने दिल्ली में कई महत्वपूर्ण प्रशासनिक पदों पर काम किया और हाल ही में दिल्ली की मुख्यमंत्री की सचिव नियुक्त हुईं।

**प्रेरणा की मिसाल**

पति के निधन के बाद मधु रानी ने न केवल खुद को संभाला, बल्कि अपनी मेहनत और लगन से देश सेवा में डटी रहीं। उनकी ईमानदारी और कर्तव्यनिष्ठा ने उन्हें एक प्रेरणादायी व्यक्तित्व बनाया। मधु रानी की कहानी उन लोगों के लिए प्रेरणा है, जो मुश्किलों के सामने हार मान लेते हैं।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# सौ. सुवर्णा वाघ यांचे सेट परीक्षेत यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धुळे जिल्हा परिषदेच्या शाळेतील प्राथमिक शिक्षिका सौ. सुवर्णा श्रीकांत वाघ या सेट (जून २०२५) परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. त्या इंग्रजी विषयात ३०० पैकी १७६ गुण (५८. ६७ टक्के) मिळवून पात्र ठरल्या.



गेल्या वर्षी त्यांची शिक्षणसेवक म्हणून सेमी इंग्रजी शिक्षिका निवड झाली होती. प्रताप महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य, इतिहास विभागप्रमुख, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. दत्तात्रय वाघ व लोकमान्य शिक्षण मंडळ संचलित नवीन मराठी शाळेच्या माजी शिक्षिका सौ.अरुणा दत्तात्रय वाघ यांच्या स्नुषा आहेत. धुळे येथील झेड. बी. पाटील महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक श्रीकांत वाघ यांच्या त्या पत्नी आहेत. सीटीईटीचे दोन्ही पेपर्स विज्ञान विषयासह प्रथम श्रेणीत त्यांनी यश संपादन केले आहे. शैक्षणिक क्षेत्रात संशोधन करण्याचा त्यांचा मानस आहे. प्राथमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. सौ. किरण जयप्रकाश कुंवर, शिंदखेडा येथील गटशिक्षणाधिकारी डी. एस. सोनवणे, प्राचार्य डॉ. एस. आर. चौधरी, प्रा.लीलाधर पाटील, प्रा. डॉ. राजा दीक्षित, प्राचार्य डॉ. एल. ए.पाटील, प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले, प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. हर्षवर्धन जाधव, उपप्राचार्य प्रा. डॉ. विजय तुंटे, प्रा. सुधीर एस. पाटील, गटशिक्षणाधिकारी अशोक बिऱ्हाडे, प्रा. डी. के. सैंदाणे, प्रा. अनिल महाले, मुख्याध्यापक लक्ष्मीकांत सैंदाणे, एस. के. लोहकरे, राजेंद्र चव्हाण, इंजि. प्रशांत वसईकर, प्राचार्य डॉ. अनिल बैसाणे, मुख्याध्यापक एस. बी. बैसाणे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# राज्याच्या इतिहासात प्रथमच एकावेळी १० हजारांपेक्षा जास्त जणांना मिळाले सरकारी नोकरीचे अपॉईंटमेंट लेटर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य रोजगार मेळावा झाला. यावेळी अनुकंपा व लिपिक भरती नियुक्ती आदेशांचे वितरण झाले. या श्रेणीतील १० हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना थेट एकाचवेळी नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. राज्याच्या इतिहासातील ही प्रथमच घटना आहे.

अनुकंपा संदर्भात अनेक नियुक्त्या रखडल्या होत्या. त्यामुळे सर्व निर्णयांचे पुनरावलोकन करून एक सोपा आणि सर्वसमावेशक शासन निर्णय झाला. अनुकंपा तत्वावर नोकरी देणे हे काही उपकार नाहीत, तर ती शासनाची जबाबदारी आहे. आतापर्यंत ८० टक्के अनुकंपा नियुया पूर्ण झाल्या असून, उर्वरित नियुक्त्या लवकरच पूर्ण केल्या जातील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

२६ नोव्हेंबर २०१८ रोजी मुंबईत झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मोरे यांची कन्या अनुष्का मोरे यांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात आली. ही बाब



समाधानाची असल्याचे मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितले. ते म्हणाले, की रिक्त पदे भरण्यासाठी टीसीएस आईबीपीएसमार्फत पारदर्शकपणे परीक्षा घेतल्या. सुमारे १ लाख लोकांना नियुक्त्या देण्यात आल्या. यामध्ये ४० हजार पोलिसांची भरतीही समाविष्ट आहे. सेवा प्रवेश नियम सुधारून नियुक्ती प्रक्रियेला वेग देण्यात येईल. २०२६ला मोठ्या प्रमाणात नोकर भरती करण्यात येईल. शासकीय सेवेत आल्यानंतर तुम्ही लोकाभिमुखतेने आणि पारदर्शी पद्धतीने कारभार करा. शासन आणि प्रशासन हे जनतेला सेवा देण्यासाठी निर्माण झाले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानानुसार जनता मालक आहे. आपण सर्वजण त्यांची सेवा करण्यासाठी नियुक्त केलेली व्यवस्था आहोत. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाशी सेवेकरी म्हणून संवाद साधा. आपल्या कामातून तुमच्याकडे येणाऱ्या किमान दहा टक्के लोकांच्या चेहऱ्यावर तुम्ही हास्य फुलवू शकलात. त्यापेक्षा मोठे समाधान जीवनात दुसरे काही नसते. आपण सेवा करण्याकरता येथे आलेलो आहोत. हा सेवाभाव तुम्ही कायम ठेवल्यास, सरकारी सेवेत काम करताना मिळणारे मानसिक समाधान कोणत्याही पैशाशी तुलना न करता येणारे समाधान असेल. यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन, मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री जयकुमार रावल, मंत्री छगन भुजबळ, मंत्री दादाजी भुसे, आमदार डॉ. परिणय फुके आदी उपस्थित होते.

# अरेच्चा ! महसूल अधिकाऱ्याकडे ३० कोटींची मालमत्ता..!!

## उत्तर प्रदेशातील प्रकार : ७ वर्षांत ४१ मालमत्ता जमा; २९ वर्षे एकाच ठिकाणी सेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर प्रदेशातील महसूल विभागातील एका अधिकाऱ्याकडे कोट्यवधींची संपत्ती आढळल्याने खळबळ उडाली आहे. आलोक दुबे या लेखापालावर जमीन घोटाळ्यात संगनमत आणि खोट्या नोंदी केल्याचा आरोप आहे.

यावरून आदित्य योगी सरकारने त्याला तत्काळ निलंबित केले. त्यानंतर आता कठोर कारवाई सुरू केली असून, त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. दुबे यांनी २०१६ ते २०२३ या सात वर्षांत ४१ मालमत्ता खरेदी केल्याचे चौकशीत उघड झाले. ज्यांचे बाजारमूल्य अंदाजे ३० कोटी रुपये आहे.

यापैकी ८.६२ हेक्टर जमीन दुबे आणि प्रादेशिक लेखपाल अरुणा द्विवेदी यांच्या नावे आढळली. या मालमत्तांमध्ये डूल गावातील जमिनींचा समावेश असून, दोन महिन्यांत दुबे यांनी आपल्या मुलाच्या नावे तीन तुकड्यांच्या जमिनी हस्तांतरित केल्या. सर्वाधिक नोंदणी २०२३ मध्ये झाली.

ज्यात मे महिन्यात चार, ऑगस्टमध्ये एक, सप्टेंबरमध्ये दोन, ऑक्टोबरमध्ये एक, नोव्हेंबरमध्ये तीन आणि डिसेंबरमध्ये एक जमीन विकली गेली. आलोक दुबे यांच्यावर वादग्रस्त जमीन व्यवहारांचे आरोप आहेत. त्यांनी कायदेशीर बंदी असलेल्या जमिनींवर वारसाहक्क नोंदवून काही करारावर तर काही विक्री केल्याचे तपासात आढळून आले. यापैकी एक जमीन आरएनजी इन्फ्रा नावाच्या खासगी कंपनीला विक्री केली. कानपूरमधील जमीन व्यवहारांशी संबंधित तक्रारी वाढल्यानंतर जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. दुबे यांनी २९ वर्षे एकाच ठिकाणी सेवा केल्याने त्यांचा स्थानिक प्रभाव वाढला होता. ज्याचा गैरफायदा घेतल्याचा आरोप आहे.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# लोण येथून म्हशी चोरीस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील लोणे येथील गोठ्यातून चार म्हशी चोरीस गेल्या आहेत. ही शुक्रवार, दि. ३ रोजी रात्री एकच्या सुमारास घडली. अनिल राजाराम पाटील यांच्या मालकीची या म्हशी आहेत. या म्हशी सुमारे ७२ हजार रुपये किंमतीच्या आहेत, असे श्री, पाटील यांनी सांगितले. सदर घटनेबाबत परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार सुनील जाधव तपास करीत आहेत.

# डॉ. बी. एस. पाटील यांचा सेवा-स्फूर्ती सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील यांचा सहस्त्रचंद्र दर्शनरूपी सेवा-स्फूर्ती सोहळा होणार आहे. रविवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता टाकरखेडा रस्त्यावरील आदिवासी आश्रमशाळेत हा सोहळा होईल. माजी विधनासभाध्यक्ष अरुणभाई गुजराथी अध्यक्षस्थानी असतील. माजी शिक्षणमंत्री अमरिशभाई पटेल प्रमुख पाहुणे असतील. धुळे यथील सनदी लेखापाल (सीए) प्रा. प्रकाशजी पाठक यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन होईल. याप्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन डॉ. निनाद बी. पाटील, सौ. सुनीताताई बी. पाटील, डॉ. सौ. अर्चना निनाद पाटील यांनी केले आहे.



# मानसिक आरोग्याबाबत लायन्स क्लबतर्फे जनजागृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लायन्स क्लबतर्फे सेवा सप्ताहांतर्गत 'मेंटल हेल्थ मॅटर्स' या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम झाला. प्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ डॉ. आदित्य महेश्वरी यांनी मार्गदर्शन केले. सोमवार, दि. ६ सायंकाळी चारला पीबीए इंग्लिश स्कूलमध्ये हा कार्यक्रम झाला.

या वेळी मानसिक आरोग्याचे महत्त्व, विद्यार्थ्यांमध्ये ताण- तणाव नियंत्रण, आत्मविश्वास वृद्धी आणि सकारात्मक विचारसरणी कशी विकसित करावी याबाबत डॉ. महेश्वरी यांनी मार्गदर्शन केले. ते म्णहाले, की मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे. स्वतःला वेळ देणे, संवाद साधणे आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे हे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. वूई सर्व्ह या भावनेतून लायन्स क्लबने हा सामाजिक उपक्रम राबवून समाजात मानसिक आरोग्याविषयी जागरूकतेचा संदेश दिला. लायन्स क्लबचे अध्यक्ष संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विंचूरकर, मुख्याध्यापक जिजाबराव देवरे आदींसह विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

फ्रेश पॉईंट
चहा | कॉफी | ग्रीन टी | दूध
थंड पेय | ब्लॅक टी | लेमन टी
तुमचं मूड करा फ्रेश...!
पत्ता : ट्रक टर्मिनस शॉपी, बाजार समिती समोरील दत्त मंदिर समोर, धुळे रोड, अमळनेर

# भारत बनला सोन्याची लंका...!

## देशात दडलाय महाप्रचंड सोन्याचा खजिना, कुलूपाची किल्ली कोणाकडे ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारताची रिझर्व्ह बँक आणि देशातील जनतेमधील सोन्याच्या क्रेझला कोणत्याही पुराव्याची गरज नाही. सणासुदीचे दिवस असो किंवा लग्नसराईचा हंगाम किंवा इतर काही कारण सोन्याची खरेदी करण्यात भारतीय कधीच मागेपुढे पाहत नाही. गेल्या काही दिवसांत सोन्याचा भाव प्रचंड महागला असून देशाच्या तिजोरीत ठेवल्या सोन्याची किंमत आता अनेक देशांच्या जीडीपी पेक्षाही जास्त झाली आहे.

भारत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव ऐकूनच आता सर्वसामान्यांना धडकी भरेल इतका प्रचंड महागला आहे. असंख्य लोकांसाठी तर सोने खरेदी आता परवडणारा विषयच राहिलेला नाही. गेल्या वर्षभरात सोन्याच्या किमती दशकांमध्ये कधीही न पाहिलेल्या पातळीवर उसळल्या आहेत. एका वर्षात सोन्याने भारतीय शेअर बाजारापेक्षा जास्त परतावा दिला आहे, ज्यामुळे खरेदीदार श्रीमंत झाले आहेत.

रोज देशांतर्गत बाजारात चढ-उतार होत असताना सोन्याच्या दरामध्ये एका दिवसात मोठे फेरबदल होत आहेत. सर्वाधिक सोन्याचा साठा असलेल्या देशांमध्ये भारताचा जगात सातवा नंबर लागतो. अमेरिका याबतीतही आघाडीवर आहे. मात्र, तुम्हाला जाणून आश्चर्य वाटेल, की भारतातील सोन्याचा भाव अनेक देशांच्या जीडीपी पेक्षा जास्त झाला आहे.

### भारतात सर्वाधिक सोन्याचा साठा कोणाकडे ?

भारताचे एकूण सोन्याचे साठे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि जनतेकडे आहेत. या सोन्याचे एकूण मूल्य आता ३० लाख कोटींपेक्षा जास्त किंवा ३.२९ ट्रिलियन झाले आहे. हे अनेक देशांच्या जीडीपी आणि भारताच्या एकूण परकीय चलन साठ्याच्या जवळपास १० पट आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीत किती सोने ?

रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीत आतापर्यंत सर्वाधिक इतके ८७९. ५८ मेट्रिक टन सोने जमा आहे. हल्ली या साठ्याचे मूल्य १०. २८ लाख कोटी रुपये किंवा ११५.७ अब्ज आहे. त्याचवेळी, एक वर्षाआधी याच सोन्याची किंमत २.७४ लाख कोटी रुपये होते. वर्षभरात या सोन्याचा भाव २७५ टक्क्यांनी वाढला आहे. दुसरीकडे, भारताच्या परकीय चलन साठ्यात सोन्याचा वाटा गेल्या वर्षी ८-९ टक्केवरून ११.५ टक्केपेक्षा जास्त झाला आहे. यामध्ये गेल्या तीन महिन्यात आरबीआयने एक टनापेक्षा कमी सोने खरेदी केले आहे. तर, जून २०२५ मध्ये मध्यवर्ती बँकेने सोने खरेदी थांबवली आहे.

### भारतातील जनतेकडे किती सोने ?

भारतीय रिझर्व्ह बँकेप्रमाणेच भारतीय कुटुंबांकडे २५ हजार टन म्हणजे देशाच्या एकूण साठ्याच्या ९५ टक्के जास्त सोने आहे. अशाप्रकारे, सध्याच्या दरांनुसार या सोन्याची किंमत २९.२१ लाख कोटी किंवा ३.२९ ट्रिलियन इतकी आहे. विशेष म्हणजे की हा जगातील सर्वात मोठा खाजगी सोन्याचा नाही तर टॉप १० केंद्रीय बँकांच्या अधिकृत साठ्यापेक्षाही जास्त आहे. भारतीय लोकांचे दाग- दागिने व सोन्यावरील प्रेम, हुंडा परंपरा, गुंतवणूक म्हणून खरेदी करणे आणि महागाईविरुद्ध लढाईमुळे देशात सोन्याचा मोठा साठा जमा झाला आहे. यामुळे भारताला अंतर्गत बळकटी देखील मिळत आहे. भारताचा एकूण सोन्याचा साठा, संघीय आणि देशांतर्गत, २५, ८०० टन आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.



# ॥ मंगळ ॥ पान

## आश्विन शुक्ल एकादशी

# आकाशदिवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आश्विन शुक्ल एकादशीपासून कार्तिक शुक्ल एकादशीपर्यंत
घराबाहेर उंच खांब पुरून त्यावर दोरीच्या सहाय्याने टांगलेला
दिवा म्हणजे आकाशदिवा. याचा विधी पुढीलप्रमाणे.

१) घराजवळील थोडी जमीन गोमयाने सारवावी.
२) त्या जागेवर चंदनमिश्रित जलाने प्रोक्षण करून अष्टदल कमल रेखाटावे.
३) कमळाच्या मध्यभागी २० हात, ९ हात किंवा ५ हात लांबीचा खांब पुरावा.
४) हा खांब वस्त्र, पताका, अष्टघंटा आणि कलशाने सुशोभित करावा.
५) खांबावर अष्टदलाकृती दीपक अडकवावा आणि त्यात मोठा दिवा लावावा.
६) कमळाच्या प्रत्येक पाकळीवर एक याप्रमाणे आठ दिवे लावावेत. हे दिवे धर्म, हर, भूती, दामोदर, धर्मराज, प्रजापती, पितर आणि प्रेत यांना उद्देशून लावावेत.
७) दिव्यात तिळाचे तेल वापरावे.
८) नंतर दीपाची पंचोपचार पूजा करून खालील मंत्राने तो वर चढवावा.

**दामोऽदराय नभसि तुलायां लोलयासह।**
**प्रदीपं ते प्रयच्छामि नमोऽनन्ताय वेधसे॥**

फल : या व्रताने लक्ष्मीप्राप्ती होते, अशी मान्यता आहे.

### पुत्रप्राप्ती व्रत

आश्विन शुक्ल एकादशीला खालीलप्रमाणे व्रत करावे.

१) स्नान करून उपवास करावा आणि भगवान विष्णूची पूजा करावी.
२) रात्री दूध देणाऱ्या सवत्स गाईची पूजा करावी.
३) दुसऱ्या दिवशी दिवसभर व्रतस्थ राहून रात्री भोजन करावे.
४) हे व्रत १२ वर्षे दर आश्विन शुक्ल एकादशीला किंवा प्रत्येक महिन्याच्या शुक्ल एकादशीला १२ महिने करावे.
५) व्रताच्या प्रत्येक वर्षी (किंवा एकवर्षीय व्रतात प्रत्येक महिन्यात) खालील नावांचा क्रमशः जप करावा.

अपराजित, अजातशत्रू, पुराकृत, पुरंदर, वर्धमान, सुरेश, महाबाहू, प्रभू, विभू, सुभूती, सुमन, सुप्रचेता.

या नावांचे हरिस्मरण केल्यास देवतुल्य आणि दीर्घायुषी पुत्रप्राप्ती होते, अशी मान्यता आहे.

# हातावरील तीळ अन् तिचे हस्तरेषाशास्त्रातील महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हस्तरेषाशास्त्रानुसार हातावरील तीळ व्यक्तीचा स्वभाव, भविष्य आणि जीवनातील विविध पैलूंना सूचित करतात. प्रत्येक बोटावरील तीळ आणि त्याच्या विशिष्ट भागांनुसार त्यांचे अर्थ खालीलप्रमाणे आहेत.

### अंगठा

अंगठ्यावरील तीळ यशस्वी पालकत्व आणि मजबूत व्यक्तिमत्त्व दर्शवितात.

**पहिला भाग (टोक) :** वडिलांकडून संरक्षण मिळते. अशा व्यक्ती निर्णायक, दृढनिश्चयी आणि कधीकधी चुका करणाऱ्या असतात.
**दुसरा भाग (मध्य) :** कुटुंबाभिमुख स्वभाव. कौटुंबिक बंधांना महत्त्व देणारे आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व.
**तिसरा भाग (तळ) :** समाजात लोकप्रियता आणि विरुद्ध लिंगाकडून आकर्षण. प्रेम आणि वैयक्तिक जीवनात चांगले भाग्य लाभते.

### तर्जनी

तर्जनीवरील तीळ स्पर्धात्मक स्वभाव आणि महत्त्वाकांक्षा दर्शवितात.

**पहिला भाग (टोक) :** कायद्याचे पालन करणारे किंवा कायद्याला आव्हान देणारे असे दोन टोकांचे स्वभाव. धाडसी आणि स्वतंत्र विचारांचे व्यक्तिमत्त्व.
**दुसरा भाग (मध्य) :** अतिशय स्पर्धात्मक आणि सर्व गोष्टींत पुढे जाण्याची इच्छा. काहीवेळा स्वतःचा अभिमान आणि इतरांशी स्पर्धा प्रबळ असते.
**तिसरा भाग (तळ) :** स्वार्थी प्रवृत्ती, विशेषतः प्रेमसंबंधांमध्ये. स्वतःच्या इच्छांना प्राधान्य देणारे व्यक्तिमत्त्व.

### मधले बोट

मधल्या बोटावरील तीळ व्यक्तीच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि जबाबदारीशी संबंधित आहे.

**पहिला भाग (टोक) :** कायद्याचे पालन करणारे आणि निष्ठावान नागरिक. मजबूत नैतिकमूल्ये असणारे व्यक्तिमत्त्व.
**दुसरा भाग (मध्य) :** जबाबदारीची जाण आणि परस्परसंबंधांना महत्त्व. सामाजिक आणि कौटुंबिक बांधिलकी जपणारे.
**तिसरा भाग (तळ) :** वास्तववादी दृष्टिकोन. विशेषतः भौतिक सुखांना प्राधान्य देणाऱ्या स्त्रियांमध्ये. व्यावहारिक आणि भौतिक जीवनावर लक्ष केंद्रित करणारे.



### अनामिका

अनामिका जोडीदार आणि रोमँटिक जीवनाशी संबंधित आहे.

**पहिला भाग (टोक) :** कलात्मक प्रतिभा आणि सर्जनशीलता. कला आणि सौंदर्याची आवड असणारे व्यक्तिमत्त्व.
**दुसरा भाग (मध्य) :** प्रसिद्धी आणि वैभवाचा पाठलाग करणारे. सामाजिक मान्यता आणि यशाची महत्त्वाकांक्षा.
**तिसरा भाग (तळ) :** भावनिकता आणि प्रणयशीलता यांचे प्रतीक. तर्कापेक्षा भावनांना प्राधान्य देणारे आणि समजूतदार स्वभाव.

### करंगळी

करंगळी पुढील पिढी आणि संततीशी संबंधित आहे.

**पहिला भाग (टोक) :** कामगिरी आणि लक्ष वेधून घेण्याची क्षमता. इतरांचे लक्ष आणि प्रशंसा मिळविण्यात समाधान मिळते.
**दुसरा भाग (मध्य) :** मजबूत कार्यकारी आणि नियोजन कौशल्य. कार्यक्षम आणि योजनाबद्ध कार्य करणारे व्यक्तिमत्त्व.
**तिसरा भाग (तळ) :** संशोधन आणि विश्लेषणात्मक क्षमता. संशोधनकार्यात यशस्वी होण्याची शक्यता.

### तळहातावरील तीळ

**आख्यायिका :** तळहातावरील तीळ मागील जन्मातील प्रेमाचे वचन दर्शवितात. असे मानले जाते, की मागील जन्मातील प्रेमींनी पुढील जन्मात एकमेकांना शोधण्यासाठी तळहातावर तीळ ठेवले. जर एखाद्याच्या उजव्या तळहातावरील तीळ दुसऱ्याच्या डाव्या तळहातावरील तीळाशी जुळत असेल, तर ते मागील जन्मातील प्रेमी असल्याचे मानले जाते.

**स्वभाव :** तळहातावर तीळ असणारे लोक विचारशील, गणनाशील आणि अचूक असतात. ते अभियंते, न्यायाधीश किंवा लेखापाल यांसारख्या क्षेत्रांसाठी योग्य असतात. ते क्वचितच चुका करतात. मात्र कधी-कधी कमी रोमँटिक असू शकतात.

हाताच्या मागील बाजूस तीळसुस्पष्ट तीळ आर्थिक व्यवस्थापनात कुशलता आणि कौटुंबिक आर्थिक सामर्थ्याची जाण. मांसल हातावर सुस्पष्ट तीळ असल्यास व्यक्ती प्रतिभावान असते. नंतरच्या आयुष्यात जलद प्रगतीची शक्यता असते.

**अस्पष्ट तीळ :** कौटुंबिक विवाद आणि संघर्ष दर्शविते. अशी व्यक्ती चिंताग्रस्त असू शकते.
**मनगटावरील तीळ आतील मनगट :** शहाणपण, विचारशीलता आणि अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याची क्षमता. समस्यांचे निराकरण करण्यात कुशल.
**बाहेरील मनगट :** सावध, जबाबदार आणि वचन पाळणारे व्यक्तिमत्त्व. जोडीदार आणि कुटुंबाची काळजी घेणारे. लग्नाच्या शपथेला महत्त्व देणारे.
**रंग आणि अर्थ :** तेजस्वी तीळ (जीवंत) : चातुर्य आणि हुशारी दर्शविते.
**मंद तीळ (मृत) :** कठोर परिश्रम आणि मेहनती स्वभाव दर्शविते.
**डावे मनगट :** करिअरसाठी शुभ.
**उजवे मनगट :** मुलांसाठी शुभ.



(छायाचित्र : नितेश बारी)

# श्रीसूक्त महिला ग्रुपतर्फे श्रीसूक्त पठण उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीसूक्त पठणाबाबत जनतेत श्रद्धा आणि जागृती निर्माण व्हावी, या उदात्त हेतूने श्रीसूक्त महिला ग्रुप, पाचोरा यांच्यातर्फे श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी श्रीसूक्त सामूहिक पठण कार्यक्रम झाला. गेल्या वर्षभरापासून सातत्याने हा धार्मिक आणि सामाजिक उपक्रम या ग्रुपतर्फे राबविला जात आहे.

या उपक्रमाला एक वर्ष पूर्ण होत असताना आज येथील श्री मंगळग्रह मंदिरात ग्रुपतर्फे श्रीसूक्ताचे सामूहिक पठण करण्यात आले. याप्रसंगी ग्रुपमधील सर्व महिला मंडळांच्या सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. वेदमंत्रांच्या स्वरांनी श्रीसूक्त पठण केले गेल्याने मंदिर परिसरातील वातावरण पवित्र झाले. श्रद्धा, भक्ती आणि संस्कार यांचा संगम झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित महिलांनी आध्यात्मिक ऊर्जा अनुभवली. श्रीसूक्त महिला ग्रुपने गेल्या वर्षभरात विविध ठिकाणी जाऊन सामूहिक पठणाद्वारे आध्यात्मिकतेचा प्रसार केला आहे. या उपक्रमाला पाचोरा शहरातील नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांनी समाजात संस्कारमूल्ये जोपासत धार्मिक परंपरेचा प्रसार करण्याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

# सप्त चिरंजीव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, विभीषण, कृपाचार्य आणि परशुराम हे सप्त चिरंजीव म्हणून प्रसिद्ध आहेत. चिरंजीव म्हणजे जे आजही जीवंत असल्याची मान्यता आहे.

**‘ अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च विभीषणः।**
**कृपः परशुरामश्च सप्तैते चिरंजीविनः’॥**

**बली :**
बली हा पौराणिक असुर राजा आणि सप्त चिरंजीवांपैकी एक आहे. तो विरोचनाचा पुत्र आणि भक्त प्रल्हादाचा नातू होता. आपले आजोबा प्रल्हादाप्रमाणे बली हा विष्णूचा परम भक्त आणि दानशूर होता. त्याच्या वडिलांचा इंद्राने कपटाने वध केल्याचा सूड घेण्यासाठी बलीने इंद्राशी युद्ध करून त्याला स्वर्गातून हाकलले. इंद्राच्या विनंतीवरून विष्णूने वामन अवतार घेतला. बलीकडून तीन पावले जमीन दानात मागितली. वामनाने दोन पावलांत स्वर्ग-पृथ्वी व्यापली. बलीला पाताळात पाठविले. परंतु त्याचा वध न करता त्याला पाताळाचा राजा बनविले.

**श्लोक :**
अतिरूपात् हता सीता | अतिदर्पाच्च रावणः |
अतिदानात् बलिर्बद्धः | अति सर्वत्र वर्जयेत् ||
अर्थ : अति दानामुळे बली बद्ध झाला. त्यामुळे सर्वच बाबतीत अतिरेक टाळावा.

**परशुराम :**
परशुराम हे विष्णूचे सहावे अवतार मानले जातात. जमदग्नी आणि रेणुका यांच्यापोटी वैशाख शुक्ल तृतीयेला त्यांचा जन्म झाला. ब्राह्मण असूनही त्यांच्यात क्षत्रियांचे गुण होते. त्यांना ‘ शापादपि शरादपि ’ (शाप आणि शस्त्र दोन्हींत निपुण) असे म्हटले जाते. भगवान शंकरांकडून त्यांनी परशू शस्त्र आणि विविध विद्या प्राप्त केल्या. या विद्यांच्या जोरावर त्यांनी दुष्ट आणि प्रजेला त्रास देणाऱ्या राजांचा संहार केला. विशेषतः सहस्रार्जुनाचा वध केला. त्यांनी जिंकलेली भूमी ऋषिकुलाला दान देऊन ते महेंद्र पर्वतावर तपश्चर्येसाठी गेले. रामायणात सीता स्वयंवरात परशुरामांनी प्रभू श्रीरामचंद्रांना शिवधनुष्य तोडल्याबद्दल आव्हान दिले. परंतु नंतर त्यांनी प्रभू श्रीरामचंद्रांना आपले धनुष्य आणि विद्या भेट दिल्या. महाभारतात त्यांनी भीष्मांना विद्या शिकविल्या आणि अंबेच्या विनंतीवरून भीष्मांशी युद्ध केले. मात्र भीष्मांनी अंबेशी विवाहास नकार दिला.

**श्लोक :**
अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः। इदं ब्राह्मम् इदं क्षात्रं शापादपि शरादपि।।
अर्थ : चार वेदांचे ज्ञान आणि शस्त्रसह धनुष्य यांचे सामर्थ्य परशुरामांत एकवटले आहे. परशुरामांचे अवतार कार्य संपल्याचा कोणताही उल्लेख ग्रंथांत नाही. त्यामुळे ते चिरंजीव मानले जातात.

**श्री हनुमान :**
श्री हनुमान हे रामायणातील लोकप्रिय पात्र आणि प्रभू श्रीरामचंद्रांचे परम भक्त, दास आणि दूत आहेत. अंजनीच्या पोटी अंजनेरी येथे त्यांचा जन्म झाला. पवनपुत्र आणि महाबली श्री हनुमान यांना जन्मतःच अनेक शक्ती प्राप्त होत्या. लहानपणी त्यांनी सूर्याला फळ समजून पकडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इंद्राने वज्राने प्रहार केल्याने ते मूर्च्छित झाले. यामुळे देवांनी त्यांना ‘ शक्तींचा विसर पडेल ’ **असा शाप दिला.**

प्रभू श्रीरामचंद्रांच्या वनवासात श्री हनुमानाची त्यांच्याशी भेट झाली. ते प्रभू श्रीरामचंद्रांचे निस्सीम भक्त बनले. रावणाने सीतेचे अपहरण केल्यावर श्री हनुमानाने लंका गाठून सीतेला प्रभू श्रीरामचंद्रांचा निरोप दिला. रावणाच्या सैनिकांनी त्याला पकडले. शेपटीला आग लावली. तेव्हा श्री हनुमानाने संपूर्ण लंका जाळली. महायुद्धात त्यांनी प्रभू श्रीरामचंद्रांना मोलाची साथ दिली. लक्ष्मण बेशुद्ध झाल्यावर श्री हनुमानाने हिमालयातून संजीवनी वनौषधी असलेला द्रोणागिरी पर्वत आणला. लक्ष्मणाचे प्राण वाचवले. श्री हनुमान चिरंजीव असून, जेथे प्रभू श्रीरामनामाचा जप होतो तेथे ते हजर असतात, अशी श्रद्धा आहे. महाभारतात ते अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होते.

**विभीषण :**
विभीषण हा लंकापती रावणाचा लहान भाऊ होता. प्रभू श्रीरामचंद्र-रावण युद्धात त्याने अधर्माच्या विरोधात प्रभू श्रीरामचंद्रांना साथ दिली. त्याच्या मृत्यूचा कोणत्याही ग्रंथात उल्लेख नसल्याने तो चिरंजीव मानला जातो.

**व्यास :**
महर्षी व्यास, पराशर ऋषींचे पुत्र यांनी महाभारताची रचना केली. त्यांना कृष्णद्वैपायन व्यास असेही म्हणतात. ते सप्त चिरंजीवांपैकी एक मानले जातात.

**कृपाचार्य :**
कृपाचार्य हे महाभारतातील हस्तिनापूरचे कुलगुरू आणि कौरव-पांडवांचे आद्य गुरू होते. त्यांच्या मृत्यूचा कोणत्याही ग्रंथात उल्लेख नसल्याने ते चिरंजीव मानले जातात.

**अश्वत्थामा :**
अश्वत्थामा हा द्रोणाचार्यांचा पुत्र आणि महाभारतातील एक शक्तिशाली योद्धा होता. त्याच्या कपाळावर जन्मतःच दिव्य मणी होता. तो शस्त्र आणि अस्त्रविद्येत अर्जुनाइतकाच निपुण होता. महाभारत युद्धात द्रोणाचार्यांनी कौरवांचे सेनापतीपद स्वीकारल्यानंतर पांडवांवर हल्ला चढवला. श्रीकृष्णाला द्रोणाचार्यांचा मुलावर जीव आहे हे ठाऊक होते. त्यांनी युधिष्ठिराला अश्वत्थामा मेला, अशी खोटी बातमी पसरवण्यास सांगितले. भीमाने अश्वत्थामा नावाच्या हत्तीचा वध केला आणि युधिष्ठिराने अश्वत्थामा मेला. मात्र नरो वा कुंजरो वा, असे सांगितले. यामुळे द्रोणाचार्यांनी शस्त्र खाली ठेवले. दृष्टद्युम्नाने त्यांचा वध केला. नंतर अश्वत्थाम्याने दृष्टद्युम्नाचा वध करून वडिलांचा सूड घेतला. युद्ध संपल्यावर त्याने पांडवपुत्रांची हत्या केली. संतप्त पांडवांनी त्याला शोधले तेव्हा अश्वत्थामा आणि अर्जुन यांनी एकमेकांवर ब्रह्मास्त्र सोडले. सृष्टीच्या विनाश टाळण्यासाठी श्रीकृष्णाने दोघांना अस्त्र परत घेण्यास सांगितले. अश्वत्थाम्याला अस्त्र परत घेण्याची विद्या माहीत नव्हती, त्यामुळे त्याने ते उत्तरेच्या गर्भात सोडले. यामुळे संतप्त श्रीकृष्णाने त्याचा कपाळावरील मणी काढला आणि त्याला शाप दिला, की तू कल्पांपर्यंत कपाळावर जखम घेऊन तेल मागत फिरशील. त्यामुळे अश्वत्थामा चिरंजीव मानला जातो.

# पाया नसलेले रहस्यमय शिवमंदिर : बृहदेश्वर मंदिर

भारतीय स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले बृहदेश्वर मंदिर हे जगातील सर्वांत अद्वितीय मंदिरांपैकी एक आहे. चोल वंशाचा राजा राजराजा प्रथम यांनी १००३-१०१० मध्ये बांधलेले हे मंदिर भगवान शिवाला समर्पित आहे. स्थानिक भाषेत याला राजराजेश्वरम किंवा तंजाई पेरिया कोविल म्हणतात. युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेले हे मंदिर त्याच्या भव्यतेसाठी, ग्रॅनाईटच्या वास्तुकलेसाठी आणि रहस्यमय बांधकामासाठी प्रसिद्ध आहे.

### जगातील पहिले ग्रॅनाईट मंदिर

बृहदेश्वर मंदिर हे जगातील पहिले पूर्णपणे ग्रॅनाईट दगडांनी बांधलेले मंदिर आहे. सुमारे एक लाख तीन हजार टन ग्रॅनाईट दगडांनी बनलेले हे मंदिर ६६ मीटर उंच आणि १३ मजली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे मंदिराच्या १०० किलोमीटर परिसरात ग्रॅनाईट उपलब्ध नाही. तरीही हे दगड कापून, चर बनवून आणि एकमेकांशी जोडून बांधले गेले. यात कोणतेही रसायन किंवा चुना वापरलेला नाही. मंदिराचा घुमट आणि त्यावरील ८० टन वजनाचा सुवर्णकलश हा स्थापत्यकलेचा अभूतपूर्व चमत्कार आहे.

### पाया नसलेले रहस्य

मंदिराचे सर्वांत मोठे रहस्य म्हणजे मंदिराला पाया नसणे. हे मंदिर जमिनीवर थेट बांधले गेले आहे. कोणतीही वास्तू बांधताना वास्तूच्या भक्कमतेसाठी आधी खोल पाया तयार करावा लागतो. मात्र या मंदिरासाठी कोणताही खोल पाया खणण्यात आला नाही. तरीही हजार वर्षांनंतरही मंदिर तसेच्या तसे उभे आहे. आणखी एक आश्चर्य म्हणजे मंदिराच्या शिखराची सावली दुपारी जमिनीवर पडत नाही. ज्यामुळे याला ‘ तरंगणारे मंदिर ’ असेही म्हणतात. शिखरावर ८८ मूर्ती आणि ८० टन वजनाचा एकच दगड कोरलेला आहे. हा दगड ६ किलोमीटर लांबीचा रॅम्प बनवून हत्तींच्या सहाय्याने बसविल्याचे सांगितले जाते.

### भगवान शिवाचे भव्य स्वरूप

मंदिरात १३ फूट उंचीचे शिवलिंग आहे. ज्यावर पंचमुखी साप फणा पसरवून बसलेला आहे. मंदिराबाहेरील भिंतींवर ‘ विमान ’ (शिखर) आहे. ज्याला दक्षिण मेरू म्हणतात. येथील नंदीचा पुतळा आणि शिवाची १३ फूट उंच मूर्ती एकाच दगडात कोरलेली आहे. मंदिराच्या भिंतींवर संस्कृत आणि तमीळ शिलालेख आहेत. ज्यात दागिन्यांशी संबंधित माहिती आहे.

### युनेस्को जागतिक वारसा

१९८७ मध्ये युनेस्कोने बृहदेश्वर मंदिराला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला. कावेरी नदीकाठी वसलेले हे मंदिर २००४ च्या त्सुनामीतही जसेच्या तसे राहिले. ज्यामुळे त्याच्या बांधकामातील टिकाऊपणा आणि मजबुती दिसून येते. मंदिराचे शिलालेख आणि शिल्पकला आजही स्पष्ट दिसतात. जे चोल वंशाच्या समृद्ध कलात्मक वारशाची साक्ष देतात.

### मंदिराचे वैशिष्ट्य आणि प्रेरणा

राजा राजराजा प्रथम श्रीलंकेच्या प्रवासात असताना त्यांना स्वप्नात हे मंदिर बांधण्याची आज्ञा मिळाली, असे मानले जाते. त्यांनी केवळ शिवभक्तीच नव्हे, तर स्थापत्यकलेतही क्रांती घडविली. मंदिराच्या शिखरावरील सुवर्णकलश सूर्य-चंद्र प्रकाशात चमकतो. त्याची सावली न पडण्याचे रहस्य शास्त्रज्ञांना आजही थक्क करते. मंदिर तंजावर शहरातून कुठूनही दिसते. या मंदिरास शहराचा गौरवशाली मुकूट मानले जाते. बृहदेश्वर मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नाही. तर भारतीय वास्तुकलेचा आणि चोल वंशाच्या वैभवाचा साक्षीदार आहे. हजार वर्षांनंतरही उभे असलेले हे मंदिर शिवभक्ती, कला आणि अभियांत्रिकी यांचा अनोखा संगम आहे.



### कसे पोहोचाल ?

तंजावरपासून (तमिळनाडू) जवळचे प्रमुख शहर तिरुचिरापल्ली आहे. जेथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि रेल्वेस्थानक आहे. तंजावरला रस्ते, रेल्वे आणि वाहतूक सुविधांनी सहज पोहोचता येते.